Vol III Issue VIII Feb 2014

Impact Factor : 2.2052(UIF)

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 2.2052(UIF)**

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-8 | Feb-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# भारतीय संदर्भात स्त्रीवादी चळवळ व मतदानाचा अधिकार

**अतुल पद्माकर खोसे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविदयालय, शिरपूर

**सारांश :-**थोडक्यात, मतदानाचा अधिकार हा राजकीय सहभागाच्या कृतीचा आत्मा झाला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये हा सहभाग लिंगभेद न मानता सर्वांना समान स्वरुपात मिळणे अपेक्षीत आहे. परंतु 20 व्या शतकापर्यंत जगातील बहूतांश राष्ट्रामध्ये स्त्रीयांना हा अधिकार नव्हता. त्या संदर्भात जगभरात वेगवेगळया स्त्रीवादी चळवळी उभ्या राहिल्या. भारतामध्ये देखील स्त्रीया या अधिकारांपासून वंचीत होत्या. या ठिकाणी असलेली बंधिस्त सामाजिक रचना परंपरागत चालीरीती रुढी परंपरा कारणीभूत होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात एका बाजूला स्त्रीयांच्या संदर्भातील सामाजिक सुधारणांना वेग येत होता. त्याच वेळी दुसऱ्या बाजूला स्त्रीवादी चळवळींनी स्त्रीयांच्या राजकीय सहभागासाठी आंदोलन उभे केले. भारतात तसेच ब्रिटीनमध्ये या संघटनांनी चर्चासत्रे, सभा, भेटी–गाठी घेवून एकप्रकारे जनमत जागृत केले. संवैधानिक मार्गाने शिष्टमंडळे पाठवून निवेदन देवून ब्रिटीश शासकांकडे आपल्या मागणीचा पाठपुरावा केला. या सर्वांचीच परिणीती म्हणून मर्यादीत प्रमाणात मॉंटेग्यु चेम्सफोर्ड कायदयामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. नंतरच्या काळामध्ये याची कार्यकक्षा विस्तृत होत गेले. आज स्वतंत्र भारताच्या घटनेमध्ये कोणत्याही प्रकारचा लिंगभेद न मानता 18 वर्षे पूर्ण झालेल्या सर्व स्त्री:पुरुषांना समान स्वरुपात मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे.

**सांकेतीक शब्द** – राजकीय सहभाग, मतदानाचा अधिकार, स्त्रीवादी चळवळ

## प्रस्तावना :

राजकीय सहभागाची पूर्वअट ही ती व्यवस्था लोकशाही मूल्यावर आधारीत असणे आवश्यक आहे. राजकीय सहभागाच्या प्रमाणावर नैसर्गीक व मानवनिर्मीत मर्यादा असू शकतात. मानवनिर्मीत राजकीय सहभागातील विषमता दूर करता येवू शकते. लोकशाही मूल्यांच्या उपलब्धतेवर राजकीय सहभागाचे स्वरुप व क्षमता अवलंबून असते. राजकीय सहभागातून सबलीकरण साध्य करता येवू शकते.

राजकीय सहभाग हा कोणत्याही राजकीय व्यवस्थेचा महत्वाचा घटक असतो. राजकीय सहभागाच्या माध्यमातून व्यक्ती राजकीय व्यवस्थेला सहयोग करत असतो. सुदृढ लोकशाहीच्या कियान्वयामध्ये सहभागाचा अधिकार महत्वाचा ठरतो. सामाजीक शास्त्राच्या अंतरराष्ट्रीय ज्ञानकोशात राजकीय सहभागाची व्याख्या अशी करण्यात आली आहे की, ''राजकीय सहभागाला लोकशाहीमध्ये मान्यता दिलेली असते, आणि सत्ताधारी हे सत्ताग्राहकाला जबाबदार असतात. या प्रकियेमध्ये मतदान करणे, माहितीची चर्चा करणे, सभांना हजर राहणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे इ. महत्वाचे असते''(1)

''राजकीय सहभाग म्हणजे नागरीकांच्या अशा किया की, ज्यांच्या माध्यमातून ते राजकारण आणि शासनावर प्रभाव पाडतात किंवा समर्थन देत असतात.''(2)

राजकीय सहभाग ही अशी प्रकिया आहे की, या प्रकियेच्या माध्यमातून जनता राजकीय कृतीमध्ये भाग घेते. निवडणूक काळातील मतदानाचा अधिकार हा राजकीय सहभागाची महत्वाची कृती समजावी लागेल. राजकीय सहभागामध्ये केवळ मतदानाचा अधिकार अंतर्भूत होत नाही, तर निवडणूक काळात प्रचार सभा मध्ये सहभागी होणे, राजकीय पक्षाचे सदस्यत्व पत्करणे, राजकीय नेतृत्वाशी संबंध प्रस्थापित करणे, राजकीय पक्षामध्ये पदाधिकारी असणे. निवडणूकीत उमेदवार म्हणून उभे राहणे, निर्णय निर्मीती प्रकियेवर प्रभाव पाडणे इ. कृतीचा सहभाग या प्रकियेत अंतर्भाव होतो.

राजकीय सहभागाचे विस्तृत क्षेत्र लक्षात घेता असे निर्दशनास येते की, महिलांचा राजकीय सहभाग हा पुरुषांच्या तूलनेत नगण्य आढळून येतो. जगातील बहूतांश राष्ट्रामध्ये स्त्रीयांचे राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधीत्व अत्यल्प असल्याचे आढळून येते. त्या महिला राजकीय निर्णय प्रकियेत सहभागी होतात त्या विशेषतः शहरी उच्चविध्याविभूशीत आहेत असे निर्दशनास येते. बहुसंख्य महिला राजकीय सहभाग व निर्णय प्रकियेपासून अलिप्त असण्याची वेगवेगळे कारणे आहेत. भारतीय संदर्भात विचार केला तर समाजात प्रचलीत असणाऱ्या परंपरागत रुढी चालीरीतीमुळे स्त्रीयांचे कार्यक्षेत्र बंधीस्त केले आहे. त्याना सार्वजनीक जिवनात दुय्यमत्व प्राप्त झाले होते. स्त्रीयांना राजकीय क्षेत्रात सहभागी

करुन घेण्यासाठी राष्ट्रीय व अंतराष्ट्रीय पातळीवर गांभीर्याने प्रयत्न झाल्याचे आढळून येत नाही. जगातील बहूतांश राष्ट्रामध्ये स्त्रियांना आपल्या अधिकारासाठी दिर्घकाळ संघर्ष करावा लागला आहे.

मतदानाचा अधिकार हा राजकीय कृतीचा सर्वमान्य व सामान्य बाब आहे. वर्तमान स्थितीमध्ये बहुतांश राष्ट्रात हा अधिकार स्त्री पुरुशांना समान स्वरुपात प्राप्त झाला आहे. परंतू 20 व्या शतकामध्ये हा अधिकार स्त्रीयांना नव्हता. जगामध्ये सर्वप्रथम अमेरीकेमध्ये स्त्रीयांनी मतदानाच्या अधिकारासाठी संघर्ष सुरु केल्याचे दिसून येते. पाश्चिमात्य उदारमतवादी लोकशाही राष्ट्रामध्ये स्त्रियांनी आपल्या व्यवस्थीतरीत्या दिलेल्या लढयातून हा अधिकार मिळवल्याचे दिसून येते.

***वेगवेगळया देशातील स्त्रीयांना मिळालेला मतदानाचा अधिकार पूढीलप्रमाणे –***

| अ.कं. | राष्ट्र | वर्षे |
|---|---|---|
| 1 | ऑस्ट्रेलिया | 1902 |
| 2 | फिनलॅंड | 1906 |
| 3 | नॉर्वे | 1913 |
| 4 | डेन्मार्क | 1915 |
| 5 | सोवियत रशिया | 1917 |
| 6 | अमेरीका | 1918 |
| 7 | इंग्लंड | 1928 |
| 8 | फ्रान्स | 1944 |
| 9 | इटली | 1945 |
| 10 | स्वित्झर्लंड | 1971 |
| 11 | सिरीया | 1971 |

Source – Samvedi, Published by DEEDS, Manglore

***भारतातील स्त्री चळवळ आणि त्यांचे राजकीय प्रतिनिधीत्वासाठी आंदोलन –***

ब्रिटीश आणि अमेरीकन स्त्रीवादी चळवळींची तुलना करता भारतातील स्त्री चळवळीला राजकीय प्रतिनधीत्वाच्या लढयात यश लवकर प्राप्त झाले. भारतीय स्त्री चळवळीला फार मोठया प्रमाणात संघर्ष करावा लागला नाही. भारतीय स्त्री चळवळीची मुख्यतः दोन टप्पे पडतात. या स्त्री चळवळीचा पहिला टप्पा 1917 ते 1928 असा होता या पहिल्या टप्प्यामध्ये स्त्रीयांना पुरुशांच्या बरोबरीने सार्वत्रीक प्रौढ मताधिकार देणे व विधीमंडळातील त्यांचे प्रतिनिधीत्व देणे. स्त्री चळवळीचा दूसरा टप्पा हा 1928 ते 1937 असा होता. दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रौढ मताधिकाराच्या तत्वाचे उदारीकरण करणे व विधीमंडळात त्याचे प्रतिनिधीत्व वाढवणे.(4)

राजकीय अधिकारासाठी सुरु झालेल्या पहिल्या टप्प्यातील स्त्रीवादी आंदोलनातील स्त्रीयांचा सहभाग फार थोडा होता. या आंदोलनातील स्त्री नेत्या ब्रिटीश अधिकाऱ्यांशी आणि भारतीय राजकीय अभिजनांपर्यत पोहचू शकत होत्या. 1917 ब्रिटीश भारत मंत्री मॉटेग्यु भारत दौऱ्यावर भारतीयांच्या नव्या घटनेच्या जनमनासाठी आले होते. मॉटेग्यु यांचा भारत दौरा हा स्त्रीवादी आंदोलनासाठी एक चांगली संधी आहे असे मार्गारेट क्युसन यांनी म्हटले. महिलांचे शिष्टमंडळ मॉटेग्यु यांच्या भेटीसाठी पाठवण्यासंदर्भात त्या सामाजीक सुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांना भेटल्या व त्यांची संमती घेतली. 17 डिसेंबर 1917 ला महिलांचे शिष्टमंडळ मॉटेग्यु यांना भेटले.(5)

या शिष्टमंडळाने आपल्या निवदेनामध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार मिळावा व स्त्रियांच्या बाबतीत शिक्षणाच्या व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात. या शिष्टमंडळामध्ये एकूण 18 भारतीय व 4 युरोपीयन स्त्रीयांचा सहभागी झाल्या होता या सर्व स्त्रिया देशातील वेगवेगळया भागातील व संघटनेचा समावेश होता. यामध्ये वुमन इंडियन असोसिएशन (W.I.A.), सेवा सदन इ. संघटनेचा समावेश होता. यामध्ये, ॲनी बेझंट, डॉ जोशी, बेगम हजरत मोहान, मार्गारेट °युजन, सरोजीनी नायडू यांचा समावेश होता.

स्त्रीयांच्या मताधिकाराच्या मागणीच्या संदर्भात ब्रिटीश शासक आणि भारतीय अभिजन यांची प्रारंभीक प्रतिकीया ही नकारात्मक होती. परंतू नंतर भारतीय नेत्यांनी स्त्रीयांच्या सार्वत्रीक प्रौढ मताधिकाराचे समर्थन केले. दोन वर्षाच्या आत ब्रिटीश अधिकाऱ्यांनी देखील स्त्री मताधिकाराची संमती दिली, परंतू यासाठी प्रांतीक विधिमंडळाच्या संमतीची अट घालण्यात आली. सुरुवातीला ब्रिटीश अधिकाऱ्यांनी स्त्रीयांच्या

मताधिकाराची मागणी अवास्तविकतेच्या मुदयावर नविन घटनेमध्ये नाकारली होती. सुरुवातीला मॉटेग्यु चेम्सफोर्ड तरतूदीमध्ये या मागणीचा उल्लेख केला नव्हता. Southborough Franchise Committee, भारतीय प्रांतीक सरकार आणि केंद्र सरकारने 1918 मध्ये ही मागणी फेटाळून लावली होती.(6)

डिसेंबर 1917 च्या कॉंगेसच्या अधिवेशनामध्ये सरोजिनी नायडू यांनी स्त्रीयांना मतदानाच्या अधिकारांचा प्रस्ताव मांडला. 1918 मध्ये प्रांतीक आणि राष्ट्रीय परिषदांच्या माध्यमातून महिला शिष्टमंडळांनी विशेषतः W.I.A. ने या मागणीसाठी एक प्रकारचा दबाव तयार केला याच दरम्यान, तिन प्रांतीक परिषदांनी, पाच प्रांतीक कॉंगेस कमिटीनी, होमरुल लिगने, मुस्लीम लिगने आणि कॉंग्रेसने स्त्रीयांच्या मतदानाच्या अधिकाराच्या समर्थनात प्रस्ताव पारित केले. भारतीय शासन व्यवहारा संदर्भात विधेयक तयार करणाऱ्या Joint Slect Committee समोर भारतीय स्त्री नेत्यांनी आपले निवदेन मांडले सरोजिनी नायडू आणि ॲनी बेझंट या कमिटीसमोर लंडनमध्ये उपस्थित राहिल्या. हिराबाई आणि मिठीबाई टाटा यांनी हे निवदेन सादर केले. बेझंट यांनी अतिशय कौशल्यपूर्वक हिंदू धर्मातील पूर्नजागरणावादी कल्पनेमध्ये स्त्रीयांना मताधिकाराची मागणी केली.

भारतातील उच्च विध्याविभूशीत वर्गाच्या संघटनेने स्त्रीयांच्या मताधिकाराचे समर्थन केले होते. देशातील सामाजिक सुधारक, पुर्नजागरणवादी, खिलाफत चळवळ, असहकार चळवळ इ. च्या माध्यमातून स्त्रीयांच्या उन्नतीसाठी आणि त्यांच्या सार्वजनिक जिवनातील सहभागासाठी आशादायी वातावरण तयार होत होते.

Joint Slect Committee समोर ज्यावेळेस सुनावणी सुरु झाली तेव्हा देशातील महत्वाच्या राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी स्त्रीयांच्या मतदानाच्या अधिकाराच्या बाजूने आपली मते मांडली. या कमिटीसमोर होमरुल लिगच्या वतीने टिळक व बेझंट कॉंग्रेसच्या वतीने पटेल आणि माधवराव, मुस्लीम लिगच्या वतीने जिन्हा आणि याकुब हसन उपस्थित झाले होते. फक्त सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी स्त्रीयांच्या मताधिकाराला विरोध केला. ब्रिटीनमध्ये महिलांचे जे शिष्टमंडळ गेले होते. त्यांनी त्याठिकाणी अनेक सार्वजनिक सभा घेतल्या या सभांना अतिशय उत्साहपूर्वक प्रतिसाद ब्रिटीश महिला संघटनांकडून मिळाला. भारतामध्ये काही संस्थानिकांनी स्त्रीयांना मतदानाचा अधिकार दिला होता. राजकोटच्या संस्थानिकांनी 1923 मध्ये तर त्रावणकोर व कोचीनमध्ये 1924 स्त्रियांना राजकीय सहभागाचा अधिकार देण्यात आला.(7)

मुंबई, मद्रास आणि संयुक्त प्रांतामध्ये स्त्रीयांना 1923 च्या निवडणूकीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने समान मतदानाचा अधिकार मिळाला मॉटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदयामध्ये स्त्रीयांना मतदानाचा अधिकार देतांना संपत्ती व मालमत्तेची पात्रता टाकण्यात आली होती.

### *निष्कर्ष –*

लोकशाहीची यशस्वीता ही राजकीय सहभागाच्या स्वरुपावर व क्षमतेवर अवलंबून असते. आणि समता हे लोकशाहीचे आधारभूत घटक असते. परंपरागत बंधीरण समाज व राजकीय व्यवस्थेत स्त्रीयांनी दुय्यमतेचे स्थान होते. या व्यवस्थेशी स्त्रीवादी चळवळीने सवैधानिक मार्गानी संघर्ष कररुन मतदानाच्या अधिकारची तर प्राप्ती केली. स्वतंत्र भारताच्य घटनेमध्ये त्यांना पुरुषांच्या बरोबरीने सार्वत्रीक प्रोढ मताधीकार देखील मिळाला. परंतू निम्मी लोकसंख्या स्त्रीयांची असून देखील देशाच्या संसदेमध्ये त्यांचे प्रतिनिधीत्व फक्त 9 % ते 10 % असल्याचे दिसून येते. स्त्रीयांचे राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधीत्व वाढावे यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न होत आहेत. यातूनच पुढे आरक्षणाची उपाययोजना समोर आली, पण राजकीय पक्षांच्या इच्छाशक्तीच्या अभावामुळे तिला मूर्तरुप मिळाले नाही. याबाबत गांभीर्याने प्रयत्न होणे अपेक्षीत आहे.

### *संदर्भसूची –*

1) International Encyclopedia of Social Sci No. 112, Network, 1968 PP-252,253

2) Lester W. Milbrath, M.L. Goel, Political Pati How and why do people Gel involved in politics, Rand minally, Chicago, 1977, PP-2

3) G.A. Almound, L.D. Powel Jr. Comparative Polities A Development approach A merinal Publishing Company, New Delhi, 1975, PP-98.

4) Margaret E. Cousinos, Indian Womanhood Today Kitabistan, Allahabad, 1941 PP32.33 and James H. Couins and Margaret E Cousins, We Two Together, Ganesh & Co, Madras, 1950, PP 308-14.

5) Quoted by Jana matson Evereti, Women and social change in India, Heritage, Delhi, 1979, PP 103.

6) Stri Dharma", quoted in Modern Review April, 1923, P 498.

7)J. K. Chopra, Women in the Indian parliament, Mittal publication New delhi, 1993, pp- 12.

8) राधा कुमार, स्त्री संघर्ष का इतिहास (1800–1990), वाणी प्रकाशन, नई दिल्ली



***अतुल पद्माकर खोसे***
राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविदयालय, शिरपूर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net